PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gulacha Ganpati
Year: 1953

Song: Ketkichya Banat
Lyricist: Ga. Di. Madgulkar

केतकीच्या बनात उतरत्या उन्हात
सळसळ पानात जपून जा
केतकीच्या बनात उतरत्या उन्हात
सळसळ पानात जपून जा
जपून जा गडे जपून जा
कुठे निघेल नाग

पायवाट लपेल काटाकुटा रूतेल
पायवाट लपेल काटाकुटा रूतेल
तळव्यात खुपेल जपून जा
ढग येता दाटून मग वाट कोठून
पाय ठेव रेटून जपून जा
ढग येता दाटून मग वाट कोठून
पाय ठेव रेटून जपून जा
जपून जा गडे जपून जा
कुठे निघेल नाग

उसळत्या वयात बळ तुझ्या पायात
चाल ठेव कह्यात जपून जा
फसू नको मोहात जरा उभी राहात
मागे पुढे पहात जपून जा
फसू नको मोहात जरा उभी राहात
मागे पुढे पहात जपून जा
जपून जा गडे जपून जा
कुठे निघेल नाग

वादळाच्या वाऱ्यात नको चालू तोऱ्यात
वादळाच्या वाऱ्यात नको चालू तोऱ्यात
पडशील भवऱ्यात जपून जा
जाऊ नको गुंगत
जाऊ नको गुंगत स्वप्नात रंगत
तुझी तुला संगत जपून जा
जाऊ नको गुंगत स्वप्नात रंगत
तुझी तुला संगत जपून जा
जपून जा गडे जपून जा
कुठे निघेल नाग
केतकीच्या बनात उतरत्या उन्हात
सळसळ पानात जपून जा
जपून जा गडे जपून जा
कुठे निघेल नाग

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*